# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०४/०५/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दित प्रभाग समिती (सी) विरार (पुर्व) मधील बहुद्देशिय इमारत (जुनी पाण्याची टाकी) करीता २५० के.व्ही.ए क्षमतेचे डिझेल जनित्र, मुख्य पॅनल व विद्युतीकरणासाठी विविध क्षमतेचे केबल बसविणे कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- वरील विषयाबाबत सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की, महानगरपालिकेने सन २०१५-१६ या वित्तीय वर्षातील विद्युत जिल्हा दर सुचीनुसार तयार केलेले अंदाजपत्रकीय रक्कम रु. ३१,९६,२८७/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच सदर कामाची इ-निविदा मागविण्यांत याव्यात असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील   सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| २ | महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत/बेकायदेशीर बांधकामे निष्कासित माहिमेवेळी अधिकारी/कर्मचारी यांची सुरक्षा तसेच महानगरपालिकेच्या मालमत्तांचे सुरक्षेसाठी सुरक्षारक्षक घेण्याबाबत. | **ठराव :-** Sainik Intelligence and Security Pvt,Ltd. यांचेकडून माहे डिसेंबर २०१५ मध्ये १८, माहे जानेवारी २०१६ मध्ये २२, माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये ४४ तर माहे मार्च मध्ये ४९ सुरक्षा रक्षक घेण्यांत आले आहेत. त्याचे देयके रक्कम रु. २१,७६,४५९/- (रु. एकविस लाख श्याहत्तर हजार चारशे एकोणसाठ मात्र) झालेले आहेत. तरी Sainik Intelligence and Security Pvt,Ltd. यांचे माहे डिसेंबर २०१५ ते माहे मार्च, २०१६ चे देयके अदा करणेकामी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा मंजूरी देत आहे. तसेच यापुढे एप्रिल २०१६ ते मे २०१६ या दोन महिन्यांसाठी Sainik Intelligence and Security Pct,Ltd यांचेकडून पुरविण्यांत आलेल्या सुरक्षा रक्षकांचे देयकास देखील ही सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे. प्रभाग समिती कार्यालयांना सुरक्षा रक्षक पुरविण्यांत आलेले नाही. या कार्यालयांना पुर्णवेळ सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक आहे. तरी प्रशासनाने महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ तसेच Sainik Intelligence and Security Pct,Ltd. यांचेकडून आवश्यकतेनुसार अतिरीक्त सुरक्षा रक्षक घेऊन प्रभाग समिती कार्यालयांना पुर्णवेळ सुरक्षा रक्षक पुरवावेत, असे निर्देश ही सभा देत आहे. त्याकामी होणाऱ्या वाढीव खर्चास देखील ही सभा वित्तीय व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. समिर डबरे   सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |